# वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे पृष्ठ

**पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,जालना**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारित तरतुदीनुसार **पोलीस अधीक्षक जालना यांचे आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली एकुण १०२ पदे भरण्यासाठी आवेदन पत्र संगणकीय प्रणाली व्दारे दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. हया बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहिती करिता प्रसिध्द करण्यात आली आहे.**

- उमेदवारास पोलीस अधीक्षक जालना यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा **policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.**
- **उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.**
- **उमेदवारांनी चुकीची माहिती दिल्यास,उमेदवारी कोणत्याही टप्यावर रदद होईल.**
- **पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल. व त्यानंतर होणारी लेखी परिक्षा ही सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरते वेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधुन संबंधित प्रवर्गाधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परिक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरते वेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारामधुन एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवड सूची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूची मध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती ((Provisional Selection) असेल शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे**

एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०/१२/२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता,शारिरीक पात्रता,आवश्यक असलेली प्रमाणपत्रे,कागदपत्रे,सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती,परिक्षा शुल्क,आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारासाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिराती मध्ये उपलब्ध आहेत. सदर जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथा करिता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी. व त्यानंतरच उमेदवारानी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

- भरती प्रक्रिये दरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चीत केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास,त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.

- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवारांने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात. परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर सलग्न याचिका मध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वाच्च न्यायालयात दाखल झलेल्या याचिका बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिराती मध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवु शकतो. व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(अजय कुमार बंसल)
पोलीस अधीक्षक,जालना

# वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे पृष्ठ

**पोलीस शिपाई चालक भरती सन २०२२-२०२३**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,जालना**

महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चालक,पोलीस हवालदार चालक,पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२,दिनांक २३.०९.२०२२ व दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारित तरतुदीनुसार **पोलीस अधीक्षक जालना यांचे आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई चालक यांची रिक्त असलेली एकुण २३ पदे भरण्यासाठी देखील आवेदन पत्र संगणकीय प्रणाली व्दारे दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. हया बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर **उमेदवारांच्या माहिती करिता प्रसिध्द करण्यात आली आहे.**

- उमेदवारास पोलीस अधीक्षक जालना यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा **policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- **उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.**
- **उमेदवारांनी चुकीची माहिती दिल्यास,उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद होईल.**
- **पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल. सदर शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त जागाच्या १:१० याप्रमाणात उमेदवार लेखी परिक्षेसाठी पात्र ठरतील.**
- **लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना,हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणाची अशी एकुण ५० गुणांची कौशल्या चाचणी दयावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यामध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवुन उमेदवारांस उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असुन कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ठ केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरते वेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी परिक्षा मध्ये प्राप्त केलेल्या एकुण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ते नुसार तात्पुरती निवड सुची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवड सूची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूची**

मध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती ((Provisional Selection) असेल. शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०/१२/२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता,शारिरीक पात्रता,आवश्यक असलेली प्रमाणपत्रे,कागदपत्रे,सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती,परिक्षा शुल्क,आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारासाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिराती मध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथा करिता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी. व त्यानंतरच उमेदवारानी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- भरती प्रक्रिये दरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चीत केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास,त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवारांने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात. परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर सलग्न याचिका मध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वाच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिका बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिराती मध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवु शकतो. व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(अजय कुमार बंसल)
पोलीस अधीक्षक,जालना